सकाळ
रविवार, १६ नोव्हेंबर २०२५

# तणावमुक्त जीवन हाच सुखी जीवनाचा मूलमंत्र : डॉ. पाटील

## 'विवेकानंद'मध्ये शिक्षक सक्षमीकरणावर कार्यशाळा



डॉ. संजीवकुमार पाटील

कोल्हापूर, ता. १५ : 'तणाव मुक्त जीवन हाच खरा सुखी जीवनाचा मूलमंत्र असून, काम, क्रोध, लोभ, मद-मत्सर यावर ज्याला नियंत्रण करता येईल, तो मनुष्य जगात सुखी असेल,' असे प्रतिपादन मनशक्ती केंद्राचे डॉ. संजीवकुमार पाटील यांनी केले. विवेकानंद कॉलेजच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाने आयोजित केलेल्या कार्यशाळेत 'शिक्षक सक्षमीकरण' या विषयावर ते बोलत होते.

त्यांनी महाभारतातील विविध पात्र स्वरूप व्यक्तींच्या स्वभावानुसार असणारे गुण आणि दोष याच्यावरती मार्गदर्शन करताना माणसाने सुखी समृद्ध आयुष्य जगण्यासाठी कोणत्या गोष्टी आत्मसात कराव्यात हे सांगितले. ते म्हणाले, 'जगात व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असतात. शिक्षकाला कुटुंब आणि कार्यक्षेत्र यांच्यात समतोल साधता आला पाहिजे, कोणतेही काम करताना ते आवडीने केले, तर त्याच्यात आनंद मिळतो आणि केलेल्या कामाचे समाधान मिळवता येते.'

समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी आभार मानले. डॉ. कविता तिवडे यांनी सूत्रसंचालन केले.

पुढारी MY कोल्हापूर रविवार, १६ नोव्हेंबर २०२५

# 'विवेकानंद'मध्ये कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचेमार्फत कायदेशीर बाबींची माहिती व्हावी म्हणून कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. यास ज्युनिअर आर्टस्, कॉमर्स व सायन्समधील विद्यार्थी, विद्यार्थिनींचा प्रतिसाद लाभला. शिबिरात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा दिवाणी न्यायाधीश डी. ए. डोईफोडे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी पोस्को कायदा व मुलींच्या लैंगिक अत्याचार प्रतिबंधक माहिती दिली. प्रा. डी. आर. पाटील यांनी स्वागत केले. सायन्स विभागप्रमुख प्रा. एम. आर. नवले यांनी आभार मानले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ज्युनिअर आर्टस् कॉमर्स विभागप्रमुख प्रा. शिल्पा भोसले, स्टाफ सेक्रेटरी प्रा. एस. टी. शिंदे, प्रा. एल. एस. नाकाडी, प्रा. पी. एन. कांबळे, प्रा. एच. जी.पाटील आदी उपस्थित होते.

दैनिक जनप्रवास
● रविवार, दि. १६ नोव्हेंबर २०२५

# विवेकानंदची बॅडमिंटन स्पर्धेत सुवर्ण कामगिरी

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठ व गोखले कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाबाई डिफेन्स बॅडमिंटन अकॅडमी येथे झोनल महिला व पुरुष बॅडमिंटन स्पर्धा आयोजित केल्या होत्या. या स्पर्धेत विवेकानंदच्या महिला व पुरुष बॅडमिंटन संघाने सुवर्णपदकाची कमाई केली.

आष्टा येथे अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे होणाऱ्या अंतर्गत इंटरझोनल महिला व पुरुष बॅडमिंटन स्पर्धेकरिता या संघाने स्थान निश्चित केले. यशस्वी खेळाडूंना विवेकानंद संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे व सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.



विजेत्या संघाचा सत्कार करताना विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे.